# 'घरत गणपती' जाणार मेलबर्न महोत्सवात!

निकिता दत्ता, भूषण प्रधान, अश्विनी भावे, अजिंक्य देव, संजय मोने, शुभांगी लाटकर आणि शुभांगी गोखले यांच्या अभिनयाने सजलेला 'घरत गणपती' हा कौटुंबिक सिनेमा नवज्योत बांदीवडेकर यांच्या दिग्दर्शनात तयार झाला होता. २६ जुलै २०२४ रोजी प्रदर्शित झालेल्या या सिनेमाने समीक्षकांकडून भरभरून कौतुक मिळवले. आता हा विनोदी आणि भावनिक गोफ असलेला सिनेमा इंडियन फिल्म फेस्टिवल ऑफ मेलबर्न २०२५मध्ये झळकणार आहे. 'घरत गणपती' ही कथा शहरात वाढलेल्या केतनची आहे, जो आपल्या दिल्लीहून आलेल्या गर्लफ्रेंडसोबत कोकणातल्या गावी गणपती साजरा करायला येतो. कौटुंबिक नातेसंबंधांतील टोकाच्या भावना, तर दुसरीकडे हास्यविनोदाची लकेर. या सर्वांचा समतोल साधत 'घरत गणपती' प्रेक्षकांच्या मनात घर करून गेला आणि आता हा चित्रपट थेट मेलबर्नमध्ये झळकणार आहे. 'इंडियन फिल्म फेस्टिवल ऑफ मेलबर्न' ऑगस्टमध्ये मेलबर्नमधील विविध ठिकाणी पार पडणार आहे. हा ऑस्ट्रेलियातील सर्वांत मोठा भारतीय चित्रपट महोत्सव असून, व्हिक्टोरियन सरकारकडून अधिकृत मान्यता प्राप्त आहे.

